**परिपत्रक नं. २१**

**अकौंट विभाग**
रयत शिक्षण संस्था,सातारा
दि.२३/०७/२०१९

सर्वश्री. शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था
यांना..

**विषय :- शाखांना मिळणा-या देणगी रकमांबाबत**

संस्थेच्या माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये व इतर शाखांना संस्थेचे हितचिंतक, सेवक, ग्रामस्थ इ. यांच्याकडून देणगी रकमा मिळतात. सदर देणगी रक्कम स्विकारण्याच्या संदर्भात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना करीत आहोत.

१. रक्कम रु. २,०००/- किंवा त्यावरील रक्कम चेकने स्विकारावी.

२. देणगीदारांना द्यावयाच्या देणगीच्या जमा पावतीवर देणगीदाराची माहिती - देणगीदाराचे संपूर्ण नांव, पूर्ण पत्ता,पॅन नंबर नमूद करणे आवश्यक आहे. तसेच सदर जमा पावतीवर "८०जी" चा शिक्का व संस्थेचा पॅन नंबर **AAATT1566E** नमूद करावा. संस्थेस वार्षिक अहवालाकरिता देणगीची माहिती देताना सदर बाबीं नमूद करावयात.

३. फॉरिन काँट्रिब्युशन अ‍ॅक्ट, १९७६ (FCRA-परकिय चलन) नुसार संस्थेचे रजिस्ट्रेशन झालेले असून रजिस्ट्रेशन नं. **083970045** हा आहे. सदर अ‍ॅक्टमधील तरतुदीनुसार संस्थेने आय.डी.बी.आय.बँक शाखा-पोवई नाका, सातारा या बँकेत स्वतंत्र बँक खाते नं. **48510010793821** उघडलेले आहे. परकिय चलनातील रक्कम चेक/डिमांड ड्राफटच्या स्वरुपात स्विकारताना ती मा.सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा या नांवे घेवून संस्थेकडे पाठवून द्यावी.

४. सन **२०१६-१७** या आर्थिक वर्षातील देणगी रकमेची माहितीची तातडीने आवश्यकता आहे. तरी सदर माहिती खालील नमुन्यात आमचेकडे पाठवून द्यावी.

---

| अ.नं. | देणगीदाराचे संपूर्ण नांव | संपूर्ण पत्ता | पॅन नंबर | रक्कम मिळाल्याचा तपशील | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दिनांक | चेक/रोख | रक्कम | |

---

सचिव,
रयत शिक्षण संस्था,सातारा